सहवेदना

शिलाताई सावंत

कुंडल : येथील माजी सरपंच शिलाताई किरण सावंत (वय ४०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे. क्रांती सहकारी साखर कारखान्याचे गटअधिकारी किरण सावंत यांच्या त्या पत्नी होत. रक्षाविसर्जन बुधवारी सकाळी कुंडल येथे आहे.

सूरज सगरे

विटा : येथील सूरज शिरीष सगरे (वय ३९) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. येथील शिरीष मल्लाप्पा सगरे यांचे ते चिरंजीव तसेच दिवंगत स्टॅम्पवेंडर बाळासाहेब सगरे यांचे पुतणे होत.

धोंडीराम माळी

सोनी : धोंडीराम नारायण माळी (रा. सोनी, ता. मिरज) यांचे दि. २४ रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोनी येथील डॉ. विनोद माळी यांचे ते वडील होत.

आरगेत दुचाकीच्या धडकेत वृद्ध जखमी

मिरज : आरग येथे भरधाव दुचाकीची धडक बसून रामचंद्र विठोबा आवळे (वय ६५, रा. बौध्द वसाहत, आवळे वस्ती, आरग) हे जखमी झाले. याबाबत ग्रामीण पोलिसात तक्रार दिली असून, संशयीत दुचाकीस्वार शिपू बापू नाईक (रा. आरग) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आवळे हे नरवाड रस्त्यावरुन चालत घरी जात होते. यावेळी चिवटे मळयाजवळ आल्यानंतर संशयीत शिपू नाईक हे (एमएच-०८-पी-४४५३) दुचाकीवरुन भरधाव वेगात आले. सदर दुचाकीची आवळे यांना धडक बसून ते जखमी झाले आहेत. याबाबत त्यांनी ग्रामीण पोलिसात तक्रार दिली आहे.

दोन दिवसात पाणी न आल्यास अधिकाऱ्यांना बांगड्या भरणार

कृष्णा कॅनॉल परिसरातील शेतकरी आदोलकांचा इशारा : पलूस, तासगाव, वाळवा येथील शेतकऱ्यांचा कृष्णा कॅनॉलमध्ये ठिय्या मारो आंदोलन

प्रतिनिधी
पलूस

येत्या दोन दिवसात पाणी सोडले नाही तर कराड, पलूस येथील पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांना बांगड्या भरणार असल्याचा इशारा पलूस, तासगाव, वाळवा येथील आंदोलक शेतकऱ्यांनी पलूस येथे दिला. सातारा जिल्ह्यातील तारळी धरणामधून कृष्णा कॅनॉलसाठी आरक्षित असणारे पाणी न सोडल्यामुळे पलूस, तासगाव, वाळवा येथील शेतकऱ्यांनी मंगळवारी कृष्णा कॅनॉलमध्ये ठिय्या मारो आंदोलन केले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी व महिला वर्ग आंदोलनात सहभागी झाले होते.

कृष्णा कॅनॉलमध्ये पाणी न आल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी मंगळवारी सकाळी तहसिलदार व पाटबंधारे विभागास निवेदन दिले. त्यानंतर कृष्णा कॅनॉलमध्ये ठिय्या आंदोलन करून आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी कृष्णाकाठ उद्योग समुहाचे नेते जे. के. बापू जाधव म्हणाले, तारळी धरणातील पाणी हे आपले हक्काचे पाणी आहे. आंदोलनाची दखल प्रशासनाने घेतली आहे. सातारा विभागात उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे. त्यामुळे पाणी सोडण्याचा निर्णय त्यांना घ्यावाच लागणार आहे. येत्या दोन दिवसात पाणी नाही आले तर त्यांना आपण वेगळया मार्गाने पाणी सोडण्यास भाग पाडणार आहे. कृष्णा कॅनॉलचा कायमचा प्रश्न सोडवण्यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. परंतु एखाद्याच्या आडमुठीपणामुळे शेतकऱ्यांना होणारा त्रास थांबवायचा असेल तर प्रत्यक्ष कृती करावी लागेल. त्यासाठी तुम्ही सदैव तयार रहा.

यावेळी द्राक्षबागादार मारूती चव्हाण म्हणाले, कॅनॉलाला पाणी न आल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जनावरांच्या

पलूसः कृष्णा कॅनॉलमध्ये पाणीसोडण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी कृष्णा कॅनॉल मध्ये ठिय्या आंदोलन केले.

चाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. चाऱ्या विना व पाण्याविना जनावरांचे दूध बंद होण्याची वेळ आल्यामुळे दूध व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या महिलांवर्गानाही अर्थिक झळ बसू लागली असल्याने त्यांनीही या आंदोलनात मोठ्या प्रमाणात सहभाग दाखवला आहे. सगळ्या भागात पाणी आहे. मिरज तालुक्यातील पाणी ओढ्या व नाले भरून कर्नाटकात वाहून जात आहे. परंतु पलूस तालुक्याला पाणी देण्यास तयार नाहीत. इंग्राजाच्या पेक्षा अंत्यत वाईट पध्दतीने वागणारे हे सरकार थोडीसुध्दा माणूसकी ठेवायला तयार नाहीत. काही जबाबदार लोक व्हिडीओच्या माध्यमातून पाणी सोडले असल्याचा दावा करीत आहेत. अशा पध्दतीने शेतकऱ्यांच्या भावनेशी खेळत असतील तर या जिल्ह्याच व महाराष्ट्राचं दुर्देव आहे. दोन दिवसात पाणी नाही आले तर पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांना बांगड्या भरणार असल्याचा इशारा मारूतीनाना चव्हाण यांनी दिला.

पलूस नगरपरिषदेचे गटनेते सुहास पुदाले म्हणाले, आवश्यक इतका पाणी साठा असून देखील सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृष्णाकॅनॉलमध्ये पाणी सोडले जात नाही. राजकीय हेतुने पाणी न सोडण्याची भूमिका घेतल्याने या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. खरतर शेतकरी हा कुठल्या पक्षाचा नाही, कॅनॉलवर अवलंबून असणारा शेतकरी पाण्यासाठी निखराची लढाई लढत आहे. आरफळ योजनेत आलेल्या पाण्याचे श्रेय जे राजकीय लोक घेत आहेत त्यांनी कृष्णा कॅनॉलला पाणी आल्याचे नाकर्तेपणापणा स्विकारावा,

गणपतराव सावंत म्हणाले, शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी सन २००४ साली शेतकऱ्यांना सोबत घेवून जे. के. बापू जाधव यांनी जनहित याचिका दाखल केली होती. जनहित दाखल करावी लागणे हेच मोठे दुर्देव आहे. २.६७ टक्के पाणी आरक्षित करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानंतर पाण्यासाठी कधी प्रयत्न करावे लागत नव्हते. अलिकडच्या काळात अडवणूक करण्याची भूमिका घेणार शासन असल्यामुळे तसेच येथील लोकप्रतिनिधी सर्व शासनाच्या विरोधातले आहेत. त्यामुळे पाणी सोडले जात नाही. अशा शासनास वटणीवर आणण्यासाठी शेतकऱ्यांना भूमिका घ्यावी लागणार आहे.

यावेळी पलूस, तासगाव, वाळवा तालुक्यातील पोपट माळी, पांडूरंग इनामदार, अजित पुदाले, गणपराव पुदाले, सुधीर जाधव, बी. एन. पवार, सुधीर पाटील, गजानन सावंत, जयकर माने, दादा मोरे, सागर मोरे, सुरज मोरे, मानसिंग मोरे, मोहन मोरे, गणेश पाटील, शिवाजीराव पाटील, बापूराव दळवी, रोहीत दळवी, अभिजीत चव्हाण यांच्यासह महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

कडेगावात ३७ लाखांचा युरियाचा संशयित खतसाठा जप्त

कृषी विभागाची कारवाई : कडेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद : २० टन बेकायदेशीर साठा जप्त

प्रतिनिधी
कडेगाव

कडेगाव एमआयडीसी येथे कृषि विभागाने केलेल्या कारवाईत ३७ लाख ८९ हजार ७७९ रुपयांचा जवळपास २१० टन संशयित बेकायदेशीर युरियाचा साठा जप्त करण्यात आला आहे. कडेगाव पंचायत समितीचे कृषी अधिकारी राहुल सुकुमार बिरनाळे (वय ३९) यांनी फिर्याद दिली आहे. गोदाम मॅनेजर शंकर जगन्नाथ काळे (वय ५३, रा.आटके, ता. कराड, जि. सातारा) याचे विरुद्ध कडेगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

कडेगाव पंचायत समितीचे कृषि अधिकारी तथा खत नियंत्रण निरीक्षक राहुल सुकुमार बिरनाळे व खत नियंत्रण निरीक्षक तथा कडेगाव तालुका कृषी अधिकारी बुकेश्वर प्रकाश घोडगे व कडेगावचे पोलीस

उपनिरीक्षक यु. आर. काळे यांनी शुक्रवार २२ मार्च रोजी रात्री ९ च्या सुमारास कडेगाव एमआयडीसी मधील प्लॉट नं. ए ३८ मधील गोदामात तपासणी केली. सदर गोदामात कृषी वापराच्या युरियाच्या ४५ किलोच्या २७२९ बॅगा आढळून आल्या. यावेळी औद्योगीक वापराच्या बॅगमध्ये युरिया असलेल्या ५० किलोच्या १३५० बॅगा आढळून आल्या. यावेळी गोदामाच्या समोर उभा असणाऱ्या ट्रक (क्र. एमएच ०४ जीआर ३००४) मध्ये ५० किलोच्या ४०० बॅगा आढळून

कडेगाव : येथे शेती कामासाठी असणारा युरिआ औद्योगिक कामासाठी बेकायदेशीर वापर करीत असताना पोलिस व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने कारवाई करून जप्त केला.

आल्या. हा ट्रक युरियाच्या बॅगा भरून वाहतुकीसाठी तयार असल्याचे दिसून आले. येथील गोदाम मॅनेजर शंकर जगन्नाथ काळे याने रासायनिक युरिया खताचे मुळ वेस्टन फोडुन तो कारखान्याच्या वापराकरीता देण्यात येणाऱ्या वेस्टनमध्ये भरुन शिलाई करुन ट्रकमध्ये भरल्याचे आढळून आले. येथे कृषी व औद्योगीक वापराचा युरिया एकूण ४४७९ बॅगा इतका बेकायदेशीर साठा आढळून आला. एकंदरीत ३७ लाख ८९ हजार ७७९ रुपये इतक्या अंदाजित किमतीचा हा बेकायदेशीर युरियाचा साठा मिळून आला आहे.

या साठ्यातून खताचा नमुना तपासणीसाठी शासकीय खत तपासणी प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे पाठविण्यात आला आहे. यावेळी गोदाम मॅनेजर शंकर जगन्नाथ काळे यांच्याकडे सदर गोदामाचा उत्पादन व विक्री परवाना दिसून आला नाही. तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारचे खरेदी बिले दाखविली नाहीत. कृत्रिम तुटवडा पाडून शेती वापरासाठीचा युरिया ओद्योगीक वापरासाठी विक्री करण्याचे उद्देशाने युरिया साठाबाजी केल्याचे आढळून आले.

शहर-ग्रामीण भागात दारुविक्रीवर कारवाई

- सहाजणांना अटक,
- साडेतीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी
मिरज

लोकसभा निवडणूक, आचारसंहिता आणि ड्राय-डे च्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहर आणि ग्रामीण भागात विनापरवना दारु विक्रीवर धडक कारवाई सुरू केली आहे. मिरज शहरासह ग्रामीण भागातील भोसे आणि एरंडोली येथे वेगवेगळी कारवाई करुन एक कार व दारुसाठा असा तीन लाख, २० हजार, ७९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सहा जणांना अटक करुन शहर व ग्रामीण पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शहरातील शास्त्री चौक परिसरातील वांडरे कॉर्नर येथे कारमधून विदेशी दारुची वाहतूक सुरू होती. पोलिसांनी (एमएच-०४-जीझेड-८३९२) कारची झडती घेतली असता १३ हजार, तीनशे रुपयांची विदेशी दारु मिळून आली. पोलिसांनी कारसह दारुसाठा असा तीन लाख, १३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. याप्रकरणी संशयीत सुरज राजाराम लोखंडे (वय ३०, रा. कवलापूर), अतुल सुरेश काळे (वय ३१, रा. आंबा चौक, कुपवाड), अमोल पंडीत भोरे (वय ३९, रा. यशवंतनगर, कुपवाड) अशा तिघांना अटक करुन शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

भोसे येथे मंगलमुर्ती हॉटेलमध्ये विनापरवाना विदेशी दारु विक्रीवर ग्रामीण पोलिसांनी कारवाई करुन संशयीत विष्णू गणपती शेजाळ (रा. भोसे) याला ताब्यात घेऊन २,३१० रुपयांची दारु जप्त केली. तर भोसे गावातीलच धनगरी गल्ली येथे विनापरवाना देशी दारु विक्री करीत असल्याच्या संशयावरुन राजकुमार भोपाल चौगुले (वय ६३) याच्यावर कारवाई करण्यात आली. त्याच्याकडून १ हजार, ५९० रुपयांची दारु जप्त केली. एरंडोली येथे मुन हॉटेलजवळ विनापरवाना विदेशी दारु विक्रीवर पोलिसांनीही कारवाई करत संशयीत अल्लाउद्दीन राजू महाबरी याला ताब्यात घेत ३७७० रुपयांची दारु जप्त केली. शहर व ग्रामीण पोलिसांनी केलेल्या वेगवेगळया कारवाईमध्ये एका कारसह दारुसाठा असा एकूण तीन लाख, २० हजार, ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

वडूज येथे बांधकाम अभियंता 'लाचलुचपत'च्या जाळयात

५० हजारांची लाच घेताना पकडले; रोहयोचे काम पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी मागितले पैसे

प्रतिनिधी
वडूज

रोजगार हमी योजनेचे काम पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी ५० हजारांची लाच घेताना वडूज येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता जितेंद्र राजाराम खलिपे (वय : ५१ मूळ रा. उभीपेठ, विटा, ता. खानापूर, जि. सांगली) यास सातारा येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले.

या प्रकरणातील तक्रारदारांचा अर्थमुव्हर्स व डेव्हलपर्सचा व्यवसाय आहे. त्यांनी आपल्या आदर्श फर्मच्या माध्यमातून तीन रस्ते व एक समूह गांडूळ खत निर्मिती शेडचे काम केले आहे. या कामाचे एकूण बील ३४ लाख होणार आहे. अभियंता खलिपे यांनी या कामांच्या काम पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी रकमेच्या दोन टक्के म्हणजे ६८ हजार रुपयांची मागणी

केली होती. तडजोडीअंती ५० हजार रुपये देण्याचे मान्य केले होते. ही लाच स्वीकारताना खलिपे यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

पोलीस उपअधिक्षक राजेंद्र वसंत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन राऊत, विक्रम पवार, हवालदार गणेश ताटे, नितीन गोगावले, शंकर सावंत, निलेश चव्हाण, प्रियांका जाधव, विक्रमसिंह कणसे, वाहन चालक मारुती अडागळे आदींनी सहभाग घेतला.

कारवाईने कार्यालयात सन्नाटा

आर्थिक वर्षाअखेरीच्या घाईगडबडीत भर दुपारी ही कारवाई झाल्याने बांधकाम कार्यालय परिसरात चांगलाच सन्नाटा पसरला होता. तर कारवाईची बातमी पसरताच अनेक कार्यालयात खाबुगिरी बहाद्दर धामाने डबडबल्याची चर्चा आहे.

मिरजेत तरुणास मारहाण

मिरज : शहरातील उत्तमनगर येथे पैशांच्या कारणातून मित्राला मारत असताना भांडणे सोडविण्यासाठी गेलेल्या तरुणाला तिघांनी दगडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी जाफर मैनुद्दीन आवटी (वय ३४, रा. कोल्हापूर चाळ, उत्तमनगर, मिरज) यांनी महात्मा गांधी चौकी पोलिसात तक्रार दिली आहे. त्यानुसार संशयीत प्रमोद श्रीमंत कांबळे, प्रदीप श्रीमंत कांबळे व राहुल श्रीमंत कांबळे अशा तिघांवर मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, सदर तरुणांमधील राडा पोलिसांसमोरच सुरू होता. पोलिसांनी सर्व संशयीतांना ताब्यात घेतले.

जाफर आवटी यांचा मित्र सागर आणि वरील तिघे संशयीत यांच्यात पैशांच्या कारणातून भांडण सुरू होते. सागर याला संबंधीत तरुण खाली पाडून लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने मारहाण करीत होते. त्यामुळे जाफर हे भांडण सोडविण्यासाठी गेले असता त्यांनाही दगडाने मारहाण करण्यात आली. या मारहाणीत ते जखमी झाले आहेत. याबाबत गांधी चौकी पोलिसात तक्रार दिली आहे.

सावली केअर सेंटर, कोल्हापूर यांना त्वरीत पाहिजेत....
डॉक्टर्स B.A.M.S./B.H.M.S.
फ्रेशर्स चालतील | ग्रामीण क्षेत्रात काम करण्याची तयारी हवी
नवनवीन अद्ययावत थेरपीज शिकण्याची सुवर्ण संधी
आयाबाई आणि वॉर्ड बॉईज
आकर्षक पगार | प्रॉव्हिडंट फंड सुविधा
गरजूंना राहण्याची सोय
संपुर्ण अर्जासह भेटा...
सावली केअर सेंटर | पिरवाडी, राधानगरी रोड, कोल्हापूर.
अपॉइंटमेंटसाठी नं. : 90969 59751

डॉल्फिन नेचर ग्रुपतर्फे राज्यस्तर बिया संकलन स्पर्धा

प्रतिनिधी
सांगली

सांगली येथील डॉल्फिन नेचर रिसर्च ग्रुप तर्फे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राज्यस्तरीय बिया संकलन स्पर्धा जागतिक वन दिनाच्या निमित्ताने जाहीर करण्यात आली.

या स्पर्धेचे हे २२ वे वर्ष आहे. सांगली येथील डॉल्फिन नेचर रिसर्च ग्रुप या पर्यावरण संवर्धन व जनजागृतीसाठी पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेली २७ वर्षे अतिशय प्रभावीपणे काम करणाऱ्या संस्थेतर्फे दरवर्षी बिया संकलन स्पर्धा आयोजित करण्यात येतात. शालेय विद्यार्थी, नवी पिढी तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये निसर्ग रक्षणाची आवड निर्माण व्हावी व विविध बिया ज्या फेकून दिल्या जातात, वाया जातात त्यांचा रोप निर्मितीसाठी उपयोग व्हावा या उद्देशाने डॉल्फिन तर्फे राज्यस्तरीय बिया संकलन स्पर्धा आयोजित केली जाते.

फळ खाल्ल्यानंतर फेकून दिले जाणारे बिया तसेच झाडावरून गळून पडणारे बिया वाया जातात. अशा बियांपासून रोप निर्मिती होऊ शकते. यासाठी या बिया संकलित करणे व योग्य पद्धतीने त्यांचे जतन करून नंतर जमिनीमध्ये रुजविणे आवश्यक असते, हा विचार डॉल्फिन नेचर रिसर्च ग्रुपचे संस्थापक शशिकांत ऐनापुरे यांनी सन २००३ मध्ये सर्वप्रथम मांडला. सन २००३ पासून ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी तसेच नागरिकसाठी खुल्या गटामधून आयोजित केली जाते. स्पर्धेद्वारे चिंच, सीताफळ, जांभूळ, बेल, आपटा, कांचन, पळस, करंज ,बहावा, हिरडा, बेहडा, महोगनी, पळस, पांगारा, कडूनिंब, शेवगा, काटेसावर, बोर, कवठ, उंबर, हादगा, तुळस, स्थानिक झाडांच्या बिया संकलित कराव्यात.

विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आपल्या शाळेतील शिक्षकांकडे आपली नावे द्यावीत किंवा श्रीराम पिठाची गिरणी पाथरवट गल्ली, खणभग, सांगली याठिकाणी किंवा संस्थेच्या कार्यालयात सम्यक क्लिनिक, बालाजीनगर गेट नंबर ३ समोर, कुपवाड रोड येथे नाव नोंद करावी. स्पर्धेत प्रथम पाच स्पर्धकांची निवड करण्यात येणार असून सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

१५ जून अखेर योग्य पद्धतीने जतन करून संकलित बिया वरील पत्त्यावर जमा करावेत. या बिया डॉल्फिन तर्फे रोप निर्मितीसाठी वापरले जातात तसेच पावसाळ्यामध्ये या बिया प्रत्यक्ष टोकण्यात येतात. उर्वरित बिया भेट स्वरूपामध्ये अनेक संस्थांना दिल्या जातात.

दरवर्षी सर्वसाधारणपणे एक ते दीड लाख बिया या स्पर्धेमधून संकलित होत असतात. आत्ता पर्यंत डॉल्फिन ग्रुपने या स्पर्धेद्वारे जवळपास २१ लाखाहून अधिक बिया संकलित केल्या आहेत. यामध्ये पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणारे, पक्ष्यांसाठी उपयुक्त असणारे, औषधी वनस्पती, दुर्मिळ वनस्पती, जंगली वनस्पती इत्यादी देशी व स्थानिक बियांचा समावेश या स्पर्धेमध्ये केला जातो, अशी माहिती संस्थेचे संस्थापक शशिकांत ऐनापुरे व बिया संकलन स्पर्धेचे संयोजक डॉ. पद्मजा पाटील यांनी दिली.

पाहिजेत
इंडियन एज्युकेशन सोसायटीचे
श्री दत्तात्रय हरी चव्हाण कन्या विद्यालय, सांगलीवाडी
जुना समडोळी रोड, जोतीबा मंदिरजवळ, सांगलीवाडी. फोन - २५३५४५५
इंडियन एज्युकेशन सोसायटी संचलित श्री दत्तात्रय हरी चव्हाण कन्या विद्यालय सांगलीवाडी या अनुदानित माध्यमिक शाळेमध्ये संचमान्यतेनुसार मान्य असणारे पायाभूत पदामधील शिक्षकेत्तर कर्मचारी पद त्वरीत भरावयाचे आहे.

अ.न	पद	शैक्षणिक अर्हता	भरावयाची एकुण पदे	जातीचा प्रवर्ग	पूर्ण वेळ / अर्धवेळ घडयाळी तास/रजा कालावधी	मानधन / वेतनश्रेणी
०१	कनिष्ठ लिपिक	वाणिज्य शाखेचा पदवीधर व MS-CIT, टायपिंग मराठी -३०/ इंग्रजी -४०	०१	खुला	पूर्णवेळ	शासन नियमानुसार

टीप: शालेय कामकाजाचा अनुभव असणाऱ्या पुरुष उमेदवारास प्राधान्य. येताना शैक्षणिक अर्हताची कागदपत्रे झेरॉक्स प्रतीसह घेऊन यावे. • मुलाखत दिनांक :- शनिवार दि. ०६/०४/२०२४ वेळ :- दुपारी ३.३० • मुलाखतीचे स्थळ : इंडियन एज्युकेशन सोसायटी सांगलीवाडी व्दारा श्री दत्तात्रय हरी चव्हाण कन्या विद्यालय जुना रोड, जोतीबा मंदीर जवळ, सांगलीवाडी.
सही/- मुख्याध्यापिका
श्री द. ह. चव्हाण कन्या विद्यालय सांगलीवाडी.
सही/- अध्यक्ष
इंडियन एज्यूकेशन सोसायटी सांगलीवाडी.

THE UGAR SUGAR WORKS LTD.
Regd. Office : Mahaveernagar, Sangli 416416, Maharashtra | CIN No: L15421PN1939PLC006738
Email : helpdesk@ugarsugar.com | Phone No. : 0233-2623717
Website : www.ugarsugar.com
DECLARATION OF RESULT OF POSTAL BALLOT
Pursuant to Section 110 of the Companies Act, 2013 read with Rule 22 of Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements), 2015, The Ugar Sugar Works Limited (the "Company") provided a facility to its members to vote on the Special Resolutions proposed in the Postal Ballot Notice dated 2nd January 2024 through remote e-voting using the platform provided by the National Securities Depository Limited (NSDL).
CS Abhay R Gulavani. Practicing Company Secretary, Scrutinizer's for the Postal Ballot, submitted his Scrutinizer's Report on 26-03-2024, Based on Scrutinizer's Report, the Result of the Postal Ballot is as under.

Sr. No	Type of Resolution	Particulars of the Resolutions	No of Shares & %age in Favour		No of Shares & %age Against	
			No of shares	%age	No of shares	%age
1	Ordinary	Payment of commission to Non-Executive & Independent Directors for the financial year 2022-23	4,16,27,771	99.40	251895	0.60
2	Special	Appointment of Shri. Sohan Sanjeev Shirgaokar as Executive Director in full time employment of the Company	3,90,70,223	93.90	25,38,107	6.10

All the above Resolutions have been passed with requisite majority based on the result of Postal Ballot through e-voting.
The results of Postal Ballot through e-voting will be displayed on the notice board of Registered Office of the Company, Communicated to Stock Exchanges and also been posted on the Website of the Company www.ugarsugar.com along with Scrutinizer's report.
By Order of the Board
For The Ugar Sugar Works Limited.
Sd/-
(Chandan S. Shirgaokar)
Managing Director
Din : 00208200
Place: Sangli
Date: 26-03-2024
Nupur Ads

खेप शेवटच्या उसाची, अन् धरणार वाट घरची

कडेगाव तालुक्यातील सर्वच कारखान्यांचा गळीत हंगाम संपला : ऊसतोड कामगार परतीच्या मार्गावर

प्रतिनिधी
कडेगाव

कडेगाव तालुक्यातील सर्व कारखान्याचाच ऊस गळीत हंगाम जवळजवळ संपत आला आहे. ऊसतोड कामगारांना परत घराकडे जाण्यासाठीची ओढ लागली आहे. दोन चार दिवसात परतीच्या मार्गावर ऊसतोड कामगार घराच्या ओढीने जाण्यासाठी आपल्या लवाजमाह परत फिरणार आहेत. सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी घरदार सोडून आलेल्या ऊसतोड कामगारांना घराकडे कधी एकदाचा जातोय असे वाटू लागले आहे. सोनहिरा येथील ऊस हंगामातील शेवटची उसाची खेप ट्रक्टरमध्ये भरल्यावर ऊसतोड कामगारांनी गाण्याच्या

कडेगाव : कारखान्यांचा गळीत हंगामाची सांगते वेळी शेवटीची खेप नेणारा ट्रॅक्टर

ठेक्यावर ताल धरतच गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला.

सहा महिन्याच्या काबाडकष्टानंतर अत्यंत आनंददायीने या ऊस गळीत हंगामाची सांगता ऊसतोड कामगारानी केली. गावी जाण्याचे वेध लागले असले तरी गावी जाताच काय करायचेच याचेच नियोजन करतच गावाकडे परतणार आहेत. गावी जाताच घराचे बांधकाम किंवा दुरुस्ती, शेतीसाठी पाणी व्यवस्था, मुलांचे शिक्षण, लग्न यासह अन्य कारणास्तव मिळालेल्या रक्कम खर्ची तर काही रक्कम कर्ज फेडण्यात जाते. असे भावनिक होत ऊसतोड कामगारच सांगतात.

पुन्हा पुन्हा आम्ही उसाचा गळीत हंगाम सुरु होताच येत असतो यामुळे ऊस बागायतदार ओळखीचेच झाले आहेत. या भागातील ऊस मनमिळावू आहेत आम्ही गावाकडे गेलो की ते आमची भ्रमणध्वनीवरुन विचारपूस करतात. या पण मायाममत्वामुळे पण आमचे पाय गावी जायला निघत नाहीत पण करणार काय, शेवटी आपले गाव आपली माणसं,नातीगोती कसं विसरुन चालेल. गावी हे जावेच लागतेच पण पुन्हा पोटासाठी ऊस कोयता हातात ध्यावा लागतोच म्हणून मी वारकरी आहे. पण पंढरपूरचा नाही. माझा कोयता हेच दैवत आहे. उसाचे थळ हेच माझे मंदिर असून सपासप ऊस तोडणी करणे हीच माझी पूजा आहे. यासाठी मी पुन्हा पुन्हा येईन. म्हणतच पुढील हंगामापर्यंत तरी गडया आपुला गाव बरा म्हणतच गावाकडे आनंदाने आपल्या घरटयात राहणार आहे. पुढील ऊस गळीत हंगाम सुरु होईपर्यंतच.